"Community Policing" अंतर्गत विविध उद्दिष्टांसाठी होणारा खर्च भागविण्यासाठी मुख्यलेखाशीर्ष २०५५ पोलीस या खाली नवीन उपलेखाशीर्ष व सांकेतांक मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः- एनएएक्स १०१७/प्र.क्र.३०५/विशा-१ब,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १२ जानेवारी, २०१८

प्रस्तावना:-

"Community Policing" या योजनेतंर्गत जातीय तणाव प्रतिबंधक उपाय योजना, गुन्हयांना प्रतिबंध, उपक्रमामध्ये युवकांचा सहभाग, ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, जनजागृती मोहिमेद्वारा लोकसहभाग, जनतेशी सुसंवाद व अन्य बाबी इ. विविध उपक्रम गृह विभागातील विविध कार्यासनामार्फत राबविण्यात येतात. त्यामध्ये कोणताही बदल न करता तसेच त्यावरील खर्चही प्रचलित धोरणानुसार करण्याच्या अधीन राहून केवळ उपरोक्त उपक्रमांवरील होणारा खर्च एकत्रितपणे दिसण्याकरिता व ताळमेळाच्या दृष्टीने "Community Policing" अंतर्गत विविध उद्दिष्टांसाठी होणारा खर्च भागविण्यासाठी मुख्यलेखाशीर्ष २०५५ पोलीस या खाली नवीन उपलेखाशीर्षास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

"Community Policing" अंतर्गत विविध उद्दिष्टांसाठी होणारा खर्च भागविण्यासाठी मुख्यलेखाशीर्ष २०५५ पोलीस या खाली नवीन उपलेखाशीर्ष व सांकेतांक निर्माण करण्यास महालेखापाल, मुंबई तसेच वित्त विभागाने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार"Community Policing" यासाठी खालीलप्रमाणे नवीन उपलेखाशीर्षास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे:-

Demand No.B-01
2055- Police
(00)109-District Police
(00)(15)-Police Co-ordination (पोलीस समन्वय) **(Committed)**
(2055 A112)

महालेखापाल, मुंबई यांच्या युओआर-९७/२०१७-१८/७८७, दिनांक १३.१२.२०१७ व वित्त विभाग अनौ. सं.क्र.७/२०१८ दि. ०५.०१.२०१८ अर्थ-११ अन्वये दिलेल्या सहमतीने शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०११२१३५१३१२८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2018.01.12 13:55:22 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सर्व पोलीस आयुक्त,
३) गृह विभागतील सर्व सह / उप / अवर सचिव, कक्ष अधिकारी,
४) महालेखापाल (१/२), महाराष्ट्र राज्य, (ले.अ.)/(ले.प.),मुंबई/नागपूर
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
६) अधिदान व लेखा कार्यलय, मुंबई
७) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), (अर्थ-१) व (अर्थ-११), मंत्रालय, मुंबई
८) निवड नस्ती (विशा१ब).